# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0151 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/03/2025 18:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 03/02/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/02/2025
   **Time From (वेळेपासून):** 14:38 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:07 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/03/2025 **Time (वेळ):** 17:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 021
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/03/2025 17:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय, वाकोडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मच्छिंद्रनाथ विठठल पोळ

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दरेवाडी,अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | दरेवाडी,अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7385534054

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल अरूण होटकर | | | 1. तलाठी सजा वाकोडी, अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
फिर्याद

ला.प्र.वि,अहिल्यानगर
दि.18/03/2025

मी मच्छिंद्रनाथ विठ्ठल पोळ, वय-34 वर्षे, धंदा- सलुन, रा. दरेवाडी, ता. जि.अहिल्यानगर मो.न. 7385534054

मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असुन दिनांक 13/08/2024 रोजी मी माझी आई विमल विठ्ठल पोळ अश्यांनी मौजे वाकोडी येथील सर्वे नं.202/6अ/1 मधील 91 चौ.मी. क्षेत्रफळ जमीन बक्षीस पत्रादवारे माझा भाउ श्री नवनाथ विठ्ठल पोळ यांस दिलेले असुन सदरची नोंद सातबारा उता-यावर लावणे करीता सदर बाबतची कागदपत्रे श्री होटकर तलाठी सजा वाकोडी यांना दिलेले होते. मागील पाच सहा दिवसांपुर्वी मी तलाठी कार्यालय वाकोडी जावुन श्री होटकर तलाठी यांना नोंदीबाबत विचारणा केली असता त्यांनी मला सांगितले की, तु मला 2500 रूपये दे ...मी तुझ्या नोंदीचे काम करून देतो त्यावेळी मी त्यांना त्याची पावती भेटती का ? असे विचारले असता त्यांनी मला सांगितले की, असल्या कामाची पावती मिळत नाही. त्यावेळी माझ्या लक्षात आले की, श्री होटकर तलाठी हे माझ्याकडे लाचेची मागणी करित आहे मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे मी दिनांक 03/02/2025 रोजी श्रीमती छाया देवरे मॅडम, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय अहिल्यानगर यांचेशी मोबाईलवर संपर्क करून मी सदरबाबत तक्रार दिली व दिनांक 03/02/2025 रोजी तलाठी भाउसाहेब श्री होटकर, सजा वाकोडी यांना भेटणार आहे असे सांगितले होते.

त्यानुसार दि.03/02/2025 रोजी पोलीस निरीक्षक छाया देवरे मॅडम, कर्मचारी व पंच हे वाकोडी अहिल्यानगर येथे सुरक्षित ठिकाणी आले सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक छाया देवरे मॅडम यांनी माझा परिचय त्यांचे सोबतचे कर्मचारी, दोन शासकीय पंचांसोबत करुन दिला.

त्यानंतर मी वरील आशयाची माझी तक्रार पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांना दोन पंचासमक्ष तोंडी सांगीतली.पोनि. देवरे मॅडम यांचे सुचने नुसार मी माझी लेखी तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन दिली ती दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली, त्यावर मी, दोन पंचांनी व पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सहया केल्या. त्यानंतर माझ्या तक्रारीवरुन श्री होटकर साहेब, सजा वाकोडी हे माझ्या वरील कामासाठी माझ्याकडे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सदर पडताळणी कारवाईमध्ये व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला, व पंचांना माहिती दिली, तसेच पडताळणी कारवाई बाबत सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे, दोन्ही पंचांचे तसेच पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचे उपस्थिती बाबत निवेदन रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिले व श्री होटकर साहेब यांची भेट घेण्यासाठी मला, पंच क्र.1 सरक यांना माझ्या कडील मोटार सायकलने रवाना केले.

त्यानुसार आंम्ही तलाठी कार्यालय सजा वाकोडी, अहिल्यानगर येथे गेलो असता त्याठिकाणी श्री होटकर साहेब हजर होते, त्यावेळी मी त्यांना नमस्कार होटकर साहेब असे बोलुन मी श्री होटकर साहेब यांचेशी माझ्या कामासंदर्भाने चर्चा केली. त्यानंतर श्री होटकर यांनी त्यांच्या हाताच्या बोटांनी पैशाबाबत सांकेतिक इशारा केला त्यावेळी मी त्यांना म्हणालो की मला अडीच सांगितले होते, तुम्हीच सांगा तुमच्या हिशोबांन त्यावेळी होटकर साहेब म्हणाले की, तुम्हाला राम बोलला होता ना..? राम किती म्हणाला होता तुम्हाला ? त्यावर मी म्हणालो तुम्ही अडीच म्हणले होते. नंतर काय दोन म्हणले होते त्यावर श्री होटकर म्हणाले की, ठिक हे करा मग..त्यावेळी मी म्हणालो.. दोन मध्ये ? त्यावर श्री होटकर साहेब यांनी होकारार्थी मान हलवली ..त्यावर मी त्यांना बरं चालल, तुम्ही आता किती वेळ आहे ? म्हणालो असता त्यावर होटकर साहेब म्हणाले की, आहे चार वाजेपर्यंत लगेच या...त्यावर मी बर

चाललं असं म्हणुन मी व पंच असे माझ्याकडील मोटार सायकलने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो.
सदर बाबत मी व पंच क्र.1 सरक अशांनी पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांना माहिती दिली. तसेच पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. त्यावरुन श्री होटकर साहेब यांनी माझ्याकडे मी माझी आई विमल विठ्ठल पोळ अश्यांनी मौजे वाकोडी येथील सर्वे नं.202/6अ/1 मधील 91 चैनी क्षेत्रफळ जमीन बक्षीस पत्रादवारे माझा भाउ श्री नवनाथ विठ्ठल पोळ यांस दिलेले असुन सदरची नोंद सातबारा उता-यावर लावणे करीता लाच मागणी करून लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर श्री होटकर साहेब तलाठी सजा वाकोडी, अहिल्यानगर यांचे विरुध्द लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा वापरण्यात येणार असुन त्याबाबत पोना काळे यांनी मला व पंचांना उजेडात व अंधारात प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचे सुचनेवरुन लोकसेवक श्री होटकर यांना दयावयाची लाच रक्कम 2000 रूपये ही माझ्या बचतीतुन हजर केली. त्यात 500 रुपये दराच्या 04 भारतीय चलनी नोटा मी हजर केल्या, त्यानंतर सदर नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर नोटांवर अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मला व पंचांना सापळा कारवाई बाबत पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी व्हाईस रेकॉर्डमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला त्यानंतर मला व पंच क्र. 1 सरक यांना श्री होटकर साहेब, तलाठी सजा वाकोडी, अहिल्यानगर यांची भेट घेवुन 2,000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी माझ्याकडील अॅव्हेटर मोटार सायकल क्र.एम. एच. 16 सी. के. 8782 हिने रवाना केले. आमचे मागोमाग सापळा पथक आले. तलाठी, कार्यालय, वाकोडी, अहिल्यानगर येथे गेल्यावर सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी आल्याची खात्री झाल्यानंतर मी व पंच नं.1 सरक असे माझी मोटार सायकल रोडच्या कडेला उभी करुन तलाठी सजा वाकोडी येथे पायी चालत गेलो त्यावेळी तलाठी सजा वाकोडी, अहिल्यानगर येथील कार्यालय आम्हाला बंद असल्याचे समजले त्यानंतर मी माझा मोबाईल क्रं. 7385534054 यावरुन श्री होटकर साहेब यांचा मोबाईल नं.7385390291 यावर फोन करुन स्पीकर ऑन करुन फोन केला असता लोकसेवक होटकर यांचे फोनची एकदाच बेळेस मोबाईल रिंग वाजुन बंद झाला त्यानंतर मी व पंच नं.1 सरक असे माझे मोटार सायकलने सुरक्षित ठिकाणी परत आलो. आमचे पाठोपाठ सापळा पथक देखील तेथे आले, त्यावेळी सदर बाबत मी व पंचांनी पोनि छाया देवरे मॅडम यांना माहिती दिली. तसेच लोकसेवक श्री होटकर, तलाठी सजा वाकोडी यांचेकडे शेंडी व इतर काही गावांचा तलाठी कार्यालयाचा चार्ज असुन त्यामुळे ते दररोज वाकोडी तलाठी कार्यालयात येत नाहीत. त्यामुळे ज्या दिवशी श्री होटकर तलाठी सजा वाकोडी कार्यालयात हजर होतील. अथवा त्यांनी माझेशी संपर्क केल्यास मी आपणास कळविल असे पोनि देवरे मॅडम यांना सांगीतले होते. त्यानंतर सदरची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली होती. त्यावेळी मी लाच म्हणुन देण्यासाठी हजर केलेल्या अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या लाचेच्या नोटा पंचासमक्ष सिलबंद करण्यात आल्या. त्यानंतर सदरबाबत पोनि देवरे मॅडम यांनी गोपनियता बाळगण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

त्यानंतर दिनांक 12/02/2025 रोजी मी पोनि छाया देवरे मॅडम यांना फोन करुन कळविले की, श्री होटकर साहेब हे तलाठी कार्यालय, वाकोडी येथे आलेले असुन मी त्यांची माझ्या कामासंदर्भाने भेट घेणार असलेबाबत सांगितले. तसेच सदर भेटी दरम्यान श्री होटकर तलाठी हे माझ्याकडे लाच मागणी पडताळणी दरम्यान मागणी केलेली 2000 रूपये लाच रक्कम स्विकारतील असे कळवुन पुढील कारवाई करावी असे सांगीतले. त्यावर पोनि देवरे मॅडम यांनी मला वाकोडी, अहिल्यानगर येथे सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी दिनांक 12/02/2025 रोजी मी वाकोडी येथे सुरक्षित ठिकाणी हजर असताना 12/30 वाजणेच्या सुमारास पोनि देवरे मॅडम हया त्यांच्या सापळा पथकासह हजर झाल्या.त्यानंतर पोनि देवरे मॅडम यांच्या सुचनेवरुन पंच नं.2

श्री भंडारे यांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर दिनांक 03/02/2025 रोजी स्थगीतीच्या वेळी अॅन्थ्रासिन पावडर लावुन सिलबंद केलेल्या नोटा सापळा कारवाईत वापरावयाच्या असलेबाबत पोनि देवरे मॅडम यांनी कळविले व त्याप्रमाणे सदरच्या सिलबंद असलेल्या नोटा हया पोकॉ गायकवाड यांनी लिफाफा फाडुन बाहेर काढल्या त्या नोटांचे नंबर व दि.03/02/2025 रोजी सिलबंद केलेल्या नोटांचे नंबर एकच असल्याची माझी व पंचाची खात्री करून देण्यात आली. त्यानंतर सदरच्या नोटा हया पोकॉ गायकवाड यांनी माझ्या शर्टच्या समोरील डाव्या खिशात ठेवुन मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला पोनि देवरे मॅडम यांनी आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि देवरे मॅडम यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्या मेमरी कार्ड मध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची

माझी व पंचांची खात्री करून दिली व लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्याबाबत नियोजित इशारा ठरवुन दिला.

त्यानंतर पोनि देवरे मॅडम यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या ताब्यात देवुन मला व पंच नं.1 यांचेसह श्री होटकर तलाठी यांची भेट घेण्याकरीता तलाठी कार्यालय, वाकोडी, अहिल्यानगर येथे जाण्यासाठी माझ्याकडील अॅव्हेटर मोटार सायकल क्र.एम. एच. 16 सी. के. 8782 हिने रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि. देवरे मॅडम, पंच नं. 02, सापळा पथकातील कर्मचारी असे शासकिय वाहनाने येवुन तलाठी कार्यालय, वाकोडी येथे बाहेर कोणास काही एक संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबले. पोनि देवरे मॅडम व सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर मी व पंच नं. 1 असे वाकोडी तलाठी कार्यालय येथे गेलो परंतु वाकोडी तलाठी कार्यालय हे बंद होते. त्यानंतर मी व पंच नं.1 असे रवाना केले त्या ठिकाणी परत आलो. आमच्या पाठोपाठ सापळा पथक देखील सुरक्षित ठिकाणी परत आले. त्यावेळी पोनि देवरे मॅडम यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद करून तो ताब्यात घेतला. त्यावर मी घडलेली हकीकत पोनि.देवरे मॅडम यांनी सांगितली.त्यानंतर माझा मोबाईल क्रं.7385534054 यावर श्री होटकर साहेब तलाठी यांचा मोबाईल क्रं.7385390291 यावरून कॉल आला त्यावेळी पोनि देवरे मॅडम यांचे सुचनेवरून मी मोबाईलचा स्पीकर ऑन करून कॉल उचलुन बोलने केले त्यावेळी मी श्री होटकर साहेब यांना म्हणालो की, भाउसाहेब कुठयं..? ऑफिसजवळ आलो होतो. त्यावर श्री होटकर म्हणाले की, ''नाही झाल तुमचं काम...काय यायची गरज नाही..त्यावर मी त्यांना म्हणालो की, मग ते पैसे दयायचे होते ना...त्यावर श्री होटकर म्हणाले की, नाही पैसे नाही लागत त्याला, झालयं काम तुमचं आता आवश्यकता नाही होवुन जाईल नोंद तुमची असे बोलुन फोन कट केला. त्यावेळी सदरचा कॉल हा व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आला.

त्यावरुन माझी पुर्ण खात्री झाली की, श्री होटकर साहेब यांना माझा काहीतरी संशय आला असल्यामुळे त्यांनी माझेकडे मागणी केलेली 2000/- रुपये लाच रक्कम भविष्यात लोकसेवक श्री होटकर हे माझेकडुन स्विकारणार नाहीत. त्यामुळे सदरची कारवाई स्थगित करण्यात यावी व आज पावेतो झालेल्या कार्यवाहीवरुन लोकसेवक श्री होटकर तलाठी सजा वाकोडी, अहिल्यानगर यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी बाबतचा सविस्तर जबाब दिला. सदरबाबत पोनि देवरे मॅडम यांनी गोपनियता बाळगण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी लोकसेवक श्री होटकर साहेब यांचेबाबत माहिती घेतली असता त्यांचे पुर्ण नाव श्री राहुल अरूण होटकर, तलाठी सजा वाकोडी, अहिल्यानगर असे असल्याचे समजले.

तरी लोकसेवक राहुल अरूण होटकर यांनी दि.03/02/2025 रोजी 14.38 ते 15.07 वा.चे दरम्यान तलाठी कार्यालय, वाकोडी, अहिल्यानगर येथील लाच मागणी पडताळणी कारवाईच्या वेळी पंच नं.1 सरक यांचेसमक्ष मी माझी आई विमल विठ्ठल पोळ अश्यांनी मौजे वाकोडी येथील सर्वे नं.202/6अ/1 मधील 91 चौ.मी. क्षेत्रफळ जमीन बक्षीस पत्रादवारे माझा भाउ श्री नवनाथ विठ्ठल पोळ यांस दिलेले असुन सदरची नोंद सातबारा उता-यावर लावणे करीता माझेकडे पंचासमक्ष लाचेची मागणी करून तडजोडीअंती 2000/-रू. लाच रकमेची मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली म्हणुन माझी श्री राहुल अरूण होटकर, तलाठी सजा वाकोडी, अहिल्यानगर यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष हे लिहुन दिले.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

jagdish dipajirao mulgir(I (Inspector)) / or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Hg.

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

A.N. [signature]

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): jagdish dipajirao mu

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):